# भगवती पॅलेस

श्री जगदंबा माताजी मंदिर, धर्मावत नगर, सर्व्हे नं. ४/१ब,
वडगाव खुर्द, सिंहगड रोड, पुणे - ४११ ०४१. (महाराष्ट्र) फोन : ०२०-२४६१६१६१
ई-मेल : booking@bhagvatipalace.com वेबसाईट : www.bhagvatipalace.com

Dharmavat Group
Real Estate & Hospitality
SINCE 1986

## भगवती पॅलेसमध्ये आपले मनःपूर्वक स्वागत करीत आहोत.
## श्री जगदंबा मातेच्या आशिर्वादाने आपलेकडील समारंभ सुसंपन्न व्हावा ही सदिच्छा.

समारंभासाठी पॅलेस घेताना खालील प्रमाणे नियम व अटींचे पालन करणे आवश्यक असून ते बंधनकारक आहेत.

१) ज्या व्यक्तींनी पॅलेस आरक्षित केले असेल त्यांनी सर्व नियम व व्यवस्थापन समजून घ्यावे, काही शंका असल्यास लगेचच निरसन करावे.

२) ज्या व्यक्तींनी पॅलेसचे अटी व नियम मान्य करुन पॅलेस आरक्षित केले असेल त्यांनीच फक्त रकमेच्या संदर्भात व्यवस्थापकांशी बोलणी करावीत. पॅलेसच्या भाड्यापोटी भरलेली रक्कम कोणत्याही कारणास्तव कार्यक्रम रद्द केल्यास परत मिळणार नाही. जादा होणाऱ्या (व्यवस्थांची) रक्कम ज्या दिवशी समारंभ असेल त्या दिवशीच पॅलेस सोडण्यापूर्वी रोख रक्कमेत द्यावी लागेल.

३) पॅलेसमधील सर्व कार्यक्रम ठरल्याप्रमाणेच व व्यवस्थापनाच्या सल्ल्यानेच करावेत.

४) पॅलेस आरक्षित करणाऱ्याने आपल्या कार्यक्रमाची पत्रिका पॅलेस वापरास घेण्याचे पाच दिवस अगोदर पॅलेस चे व्यवस्थापकाकडे आणून दिली पाहिजे.

५) पॅलेसचे आरक्षण फोनवरुन केले जात नाही, प्रत्यक्ष भेटून खात्री करुनच आरक्षण करणे आवश्यक आहे.

६) पॅलेसच्या बाहेरील व आतील आवारात बँड, फटाके व लाऊड स्पीकर किंवा इतर मोठे आवाज करणारी वाद्ये वाजवण्यास पूर्णत: बंदी आहे. वरात व भिक्षावळ यासाठी पूर्णपणे बंदी आहे.

७) पॅलेसमध्ये कार्यासाठी येताना व जाताना आपले सर्व सामान व इतर सामान ने-आण करण्याची व्यवस्था आरक्षणकर्त्याने स्वत:ने करावयाची आहे. त्या कामासाठी पॅलेस तर्फे कोणत्याही परिस्थितीत पॅलेसचा सेवक वर्ग मिळणार नाही.

८) पॅलेसमध्ये कार्यासाठी आल्यावर आपले सामान, पैसे, इतर मौल्यवान वस्तु स्वतःच्या जबाबदारीवर आणून त्याचा सांभाळ करावा. आपली कुठल्याही प्रकारची कोणतीही वस्तु हरविल्यास, गहाळ झाल्यास, मोडतोड झाल्यास, चोरीस गेल्यास व्यवस्थापन जबाबदार राहणार नाही.

९) कार्यक्रमाबद्दल काहीही व कुठलेही कायदेशीर परवाने असतील तर ते मिळविणे आरक्षणकर्त्याची जबाबदारी राहिल, त्याची एक सत्यप्रत पॅलेस च्या व्यवस्थापकाकडे ताबा घेण्यापूर्वी द्यावी लागेल. त्याशिवाय पॅलेस चा ताबा दिला जाणार नाही.

१०) पॅलेसमध्ये येणाऱ्या वाहनांसाठी पार्किंगची व्यवस्था पॅलेस व मंदिराच्या मुख्य प्रवेशद्वाराच्या बाहेरील बाजूस राहील. वाहनांची पार्किंग आरक्षणकर्त्याने स्वत:च्या जबाबदारीवर करावी.

११) मुख्य हॉल, डायनिंग, टेरेस, जिना पॅसेज यामध्ये कोठेही झोपण्याची व्यवस्था केली जाणार नाही.

१२) केटरिंग, फुलांची सजावट, मांडव सजावट, इलेक्ट्रिक सजावट यांची व्यवस्था पॅलेसमार्फत केली जाईल. स्वतंत्र व्यवस्था करता येणार नाही व त्याचे जे वेगळे चार्जेस असतील ते त्याप्रमाणे आरक्षणकर्त्याला द्यावे लागतील.

१३) पॅलेसचा ताबा कार्याच्या आदल्या दिवशी रात्री ८ वाजता दिला जाईल व कार्य झालेल्या दिवशी संध्याकाळी ५ वाजता पॅलेसचा ताबा सोडावा लागेल. पॅलेसचा ताबा सोडण्या अगोदर ४.०० व ४.३० वाजता बेल वाजविली जाईल. पॅलेसचा ताबा परत देण्यापूर्वी आरक्षण कर्त्यांनी पॅलेस मधून आपले संपूर्ण सामान काढून घ्यावे सदरील सामान न काढल्यास आरक्षणकर्त्यांच्या कोणत्याही व कसल्याही सामानाची जबाबदारी पॅलेस वर किंवा पॅलेसच्या व्यवस्थापकावर राहणार नाही.

१४) लग्न होणाऱ्या मुलाचे व मुलीचे संपूर्ण नाव, पत्ता, फोन क्रमांक व ई-मेल आयडी आमच्याकडील छापील अर्जावर लिहिणे आवश्यक आहे. त्यासोबत आयडी प्रुफ जोडणे सुध्दा आवश्यक आहे.

१५) पॅलेसमध्ये किंवा पॅलेसच्या आवारात वीज, पाणी, गॅस, लिफ्ट व इतर कोणत्याही कारणास्तव अपघात होऊन जिवीतहानी किंवा वित्तहानी झाल्यास तसेच आरक्षणकर्त्याच्या सामानाची चोरी झाल्यास त्यास आरक्षण कर्ता सर्वस्वी जबाबदार राहिल. पॅलेसच्या व्यवस्थापनाची कोणतीही जबाबदार राहणार नाही.

१६) पॅलेस मध्ये खिळे किंवा स्क्रु लावणे, कागद किंवा पोस्टर्स चिकटवणे, रंगसफेदी खराब होईल असे वर्तन करणेस सक्त मनाई आहे.

१७) पॅलेस मध्ये मांसाहार, अंडी, दारु, किंवा इतर नशेच्या व प्रतिबंधित पदार्थांच्या प्रवेशास, त्यांच्या वापरास किंवा सेवनास सक्त मनाई आहे. त्याचबरोबर अश्लील व अनैतिक वर्तन करण्यास, दाखवण्यास किंवा पाहण्यासाठी सक्त मनाई आहे.

१८) पॅलेसच्या आवारात कोठेही पान, तंबाखु, गुटखा खाऊन थुंकल्यास आणि धुम्रपान केल्यास संबंधीत व्यक्ति किंवा आरक्षणकर्त्यांकडुन रू.१०००/- दंड वसूल केला जाईल.

१९) जनरेटर पाहिजे असल्यास त्याचा चार्ज वेगळा आकारला जाईल. प्रति तास १०००/- व ५ मिनिटे वाढले तरी १ तासाचा चार्ज पडेल.

२०) पॅलेसचा ताबा घेताना सर्व वस्तु उदा. फर्निचर, विद्युत उपकरण, खोल्यांमधील गाद्या, उशी, कव्हर वगैरे तपासून घ्यावे. पॅलेसचा ताबा परत देताना वरील बाबतीत काही वस्तू कमी किंवा वस्तूंचे नुकसान झालेले आढळल्यास त्याची योग्य ती नुकसान भरपाई द्यावी लागेल. तसेच पॅलेसमधील कोणतीही वस्तु पॅलेसमधुन बाहेर घेऊन जाता येणार नाही याची नोंद घ्यावी.

२१) काही आकस्मिक कारणास्तव लिफ्ट नादुरुस्त असल्यास त्याबाबत तक्रार करता येणार नाही.

२२) प्रचलित सरकारी सेवाकर व इतर काही कराची आकारणी झाल्यास भाडयाशिवाय वरील कर पॅलेस आरक्षित करणाऱ्यास द्यावे लागतील.

२३) पॅलेस मध्ये कायमस्वरुपी म्हणून लावण्यात आलेल्या छायाचित्रांचा, नावाच्या फलकांचा व अन्य शिल्पांचा आदर राखला पाहिजे.

२४) पॅलेसधील स्वयंपाकगृह व चहापाणी खोली व्यतिरिक्त इतर खोल्यांमध्ये किंवा हॉलमध्ये स्वयंपाक, चहापाणी बनवता येणार नाही. सबब गॅस, स्टोव्ह, शेगडी वगैरे इतरत्र वापरण्यावर सक्त मनाई आहे. कोणत्याही प्रकारचे खाण्याचे पदार्थ अथवा अन्य साहित्य बाहेरुन आणता येणार नाही.

२५) पॅलेसचे इमारतीत व इमारतीचे बाहेरील भागात पॅलेस व्यवस्थापनातर्फे उपलब्ध करुन दिलेली दिव्याची रोषणाईच फक्त वापरता येईल. त्याव्यतिरिक्त इतर कोणतीही जादाची रोषणाई पॅलेसचे इमारतीचे आत अथवा बाहेरील भागात करता येणार नाही.

२६) वरील सर्व नियमांचे पालन होत आहे किंवा नाही हे पाहण्यासाठी पॅलेसचे व्यवस्थापक अथवा पदाधिकारी पॅलेसमध्ये केव्हाही येऊ शकतात. त्यांचे प्रवेशास कोणासही प्रतिबंध करता येणार नाही किंवा तक्रार करता येणार नाही.

२७) पॅलेस मधील येणाऱ्या लोकांपैकी निमंत्रित व इतर असा फरक ओळखणे हे पॅलेसमधील सेवकास शक्य नसते म्हणून आपल्या खोलीतील मौल्यवान वस्तू व रोख रक्कम याची काळजी घेण्यासाठी आपल्या विश्वासू व्यक्तिच्या देखरेखी खाली ठेवाव्यात. पॅलेस अशा गोष्टींची जबाबदारी घेणार नाही.

२८) पॅलेसचे आरक्षण करणारे व त्याचा वापर करणाऱ्यांवर पॅलेसचे वरील सर्व नियम बंधनकारक आहेत. पॅलेस आरक्षण करणेपूर्वी सर्व अटी नियम, पॅलेसमधील सुखसुविधा यांचा पूर्ण विचार करुनच पॅलेसचे आरक्षण करावे. वरीलपैकी कोणत्याही नियमांचे उल्लंघन झाल्यास पॅलेसमधील कार्यक्रम ताबडतोब थांबविणे, आरक्षण रद्द करणे व पॅलेसचा ताबा घेण्याचा अधिकार व्यवस्थपनाकडे राहील.

२९) कोणत्याही स्वरुपाचा कायदेशीर वाद, समस्या निर्माण झाल्यास तो पुणे येथील न्यायालयीन कक्षेत सोडविला जाईल.

३०) कालमानाप्रमाणे वेळोवेळी बदललेले सर्व नियम आरक्षणकर्त्यावर बंधनकारक राहतील.

---

महोदय,

मी/आम्ही वरील सर्व नियम व अटी क्र.१ ते ३० पूर्णपणे वाचल्या असून त्या मला/आम्हाला मान्य असून आमच्यावर बंधनकारक आहेत. मी/आम्ही तसेच माझ्यातर्फे/आमच्यातर्फे पॅलेसमध्ये कार्यक्रमासाठी येणारे नातेवाईक, मित्र मंडळी व उपस्थित सर्वजण वरील सर्व नियम व अटींचे पालन करू. नियम व अटींचा भंग झाल्यास होणारे परिणामास व आर्थिक दंडास मी/आम्ही जबाबदार आहे./आहोत.

आरक्षणकर्त्याचे नाव : ______________________________

फोन : ______________________________

दिनांक : / /

पॅलेस आरक्षण करणाऱ्यांची सही

आरक्षणकर्त्याचे नाव : ____________________

फोन : ____________________ डिपॉझिट जमा रु. [ ]

## मीटर रिडींग

नंतरचे ____________ सही ____________

सुरुवातीचे ____________ सही ____________

एकूण ____________

**डिपॉझिट [ रु. ] मधून वजा होणारी रक्कम**

१) लाईट बिल (एकूण युनिट X प्रती युनिट रु. ) [ रु. ]

२) जनरेटर पाहिजे असल्यास त्याचा चार्ज वेगळा आकारला जाईल,

दर तासाला रु. १०००/- व ५ मिनिटे वाढला तरी १ तासाचा चार्ज पडेल.

रु. १००० X तास = [ रु. ]

३) काही तोडफोड आणि नुकसानी पोटी [ रु. ]

४) उर्वरित रक्कम घेणे [ ] / देणे [ ] [ रु. ]

उर्वरित रक्कम [ रु. ] परत मिळाली.

सही : ____________



आभारी आहोत.

# श्री आईजी केटरर्स

२४ क्यू , अप्पर मार्केट, व्हि. आय. टी. कॉलेज, अप्पर, बिबवेवाडी, पुणे - ४११ ०३७. फोन : ०२० - २४६१६१६१ मो.: ९८२२८५५७७५

**आपले संपूर्ण कार्य, जेवण ६०० (१०० + ५००) व्यक्तींसाठी,**

**एकूण रु. /- यामध्ये मिळणाऱ्या सुविधा + टॅक्स १२.३६%**

* **कार्यालय आदले दिवशी रात्री ८ ते दुसरे दिवशी सायं. ५ वाजेपर्यंत मिळेल.**
* **कार्याची तयारी :** वधुवरांचा फुलांचा पोषाख (फुलांचे हातातील गजरे, हार इ.), १०० गजरे इ., ओटीसाठी गुळखोबरे, अत्तर, गुलाबपाणी, विहीणींचे पाय धुण्याची तयारी, हळद-कुंकू, १० नारळ, ओटीसाठी गहू - तांदूळ, गौरीहार, घाणासाहित्य, अक्षता, ५०० व्यक्तींसाठी पेढे, गादी सेट २५ नग, आदल्या दिवशी नवरदेव स्वागतासाठी पायघड्या, एका बाजूसाठी गुरुजी, दुसऱ्या बाजूसाठी हवे असल्यास आधी सांगणे आवश्यक आहे. त्याचे चार्जेस वेगळे पडतील. (रुखवत व्यवस्था १० व्यक्तींसाठी)
* **चहा-कॉफी :** हॉलमध्ये आल्यावर १ तास किंवा दुसऱ्या दिवशी २ तास
* **सीमांत पूजनाचे जेवण १०० व्यक्तींसाठी (बुफे) :** वरण-भात / मूग खिचडी, तूप, मीठ, लिंबू, लोणचे, चटणी, पापड/मिरगुंड, गरम फरसाण, कोशिंबीर, व्हेज माखनवाला/रस्साभाजी, आमटी/कढी/दाल फ्राय, शिरा, पुरी, फुलका, जेवणानंतर मसाला सुपारी (जास्त पानास रु. ) रु. /-
* **नाष्टा १०० व्यक्तिंसाठी (बुफे) :** बटाटा पोहे/ कांदा पोहे / उपमा / इडली वडा सांबार चटणी / आलू पराठा (जास्त पानास रु. ) रु. /-
* **विवाहाचे मुख्य भोजन ५०० व्यक्तींसाठी (बुफे) :** वरणभात, मसालेभात, आळू भाजी, दोन भाज्या (सुकी बटाटा भाजी, मटकी उसळ/मटार उसळ/बिरडी उसळ), भजी/बटाटा वडा/कॉर्न कटलेट/सुरळी वडी, पुरी, फुलका, कोशिंबीर, मीठ, लिंबू, चटणी, पापड, लोणचे, जेवणानंतर मसाला पान
  एक पक्वान : गुलाबजाम / जिलेबी / मुग हलवा (यापैकी एक) (जास्त पानास रु. ) रु. /-
* **चांदीचा सेट :** ताट, वाटी, चमचा, ग्लास, फुलांची महिरप (२ सेट)
* **मेनूमध्ये बदल करावयाचा झाल्यास जादा आकार पडेल.**

एकूण रु.

## 'भगवती पॅलेस' तर्फे मिळणाऱ्या सुविधा

प्रशस्त समारंभ हॉल, भव्य व्यासपीठ, स्वतंत्र भोजन कक्ष, ४ वातानुकूलित खोल्या, २ साध्या खोल्या, २५ गादी सेट, गरम पाणी, लिफ्ट, स्वच्छतागृहे, पार्किंग व्यवस्था, जनरेटरची सुविधा (मर्यादित)

## 'भगवती पॅलेस' दिवस म्हणजे

आदल्या दिवशी रात्री ८.०० वा. ते कार्याच्या दिवशी सायं. ५.०० वा. पर्यंत

१) केटरिंग बुकींगसाठी रक्कम रोख भरावेत.
२) झालेले बुकींग कोणत्याही कारणास्तव रद्द करता येणार नाही. अथवा दिवस बदलून मिळणार नाही. अथवा पैसे परत मिळणार नाहीत.
३) सरकारी नियमाप्रमाणे टॅक्स वेगळे द्यावे लागतील.
४) जेवणाचा मेनू कार्याच्या अगोदर ६० दिवस निश्चित करावा. अंदाजे खर्चाप्रमाणे बाकी रक्कम त्यावेळी अथवा कार्याअगोदर ३० दिवस भरावी लागेल.
५) भोजनाची पाने आयत्यावेळेस कोणत्याही कारणांनी कमी झाल्यास त्याचे पैसे फायनल बिलातून कमी होणार नाहीत. अथवा अन्न साहित्य बाहेरुन आणता येणार नाही व बाहेर नेता येणार नाही.
६) अन्न हे पुर्णब्रम्ह आहे हे आपण सर्व जाणतोच आणि म्हणूनच पानामध्ये अन्न वाया जाईल एवढा आग्रह मुळीच करु नये.
७) कार्याच्या दिवशी असलेल्या बाजार भावानुसार जेवणाचे दर राहतील.
८) पेढे, अत्तर, गुलाबदाणी वाटपाची व्यवस्था आपणासच करावी लागेल.
९) जादा होणाऱ्या गोष्टींची रक्कम समारंभाच्या दिवशी रोख स्वरुपात द्यावी लागेल.
१०) फुलांचे डेकोरेशन, मांडव इ. व्यवस्था ऑर्डरप्रमाणे केली जाईल, स्वतंत्रपणे करता येणार नाही.
११) व्हिडिओ, फोटोग्राफीची स्वतंत्र व्यवस्था ऑर्डरप्रमाणे केली जाईल.
१२) कोणत्याही स्वरुपाचा कायदेशीर वाद / समस्या निर्माण झाल्यास तो पुणे येथील न्यायालयीन कक्षेत सोडविला जाईल.
१३) बाहेर गावच्या पार्टीने व्यवहार रोखीने / डी.डी. ने करावा.
१४) कृपया समारंभाच्या परिसरात पाळीव प्राणी आणू नयेत.

## जादा खर्च (ऐच्छिक) - मेनू बदल, डेकोरेशन, फोटो, व्हिडिओ व वेलकम ड्रिंक व्यवस्थेचे दर पत्र

| | | | |
|---|---|---|---|
| रात्री भोजन | स्वीट शिरा ऐवजी | श्रीखंड / गुलाबजाम<br>पायनापल शिरा<br>मुग हलवा<br>दुधी हलवा<br>गाजर हलवा | पानास रु. ३५/-, २५/-<br>पानास रु. १०/-<br>पानास रु. ३०/-<br>पानास रु. २५/-<br>पानास रु. ३५/- |
| दुपार भोजन | स्वीट जिलेबी /<br>गुलाबजाम / मुग हलवा<br>यांचे ऐवजी | आम्रखंड, केशर श्रीखंड<br>बासुंदी<br>अंगुरमलई<br>अंगुर रबडी<br>चमचम/मलई सँडविच/राजभोग<br>स्ट्रॉबेरी/सिताफळ रबडी<br>पुरणपोळी<br>मोदक | पानास रु. ४०/-,३०/-<br>पानास रु. ४५/-<br>पानास रु. ५०/-<br>पानास रु. ५०/-<br>पानास रु. ४०/-<br>पानास रु. ४५/-<br>पानास रु. ४०/-<br>पानास रु. ४०/- |
| | पंजाबी भाजी | टोमॅटो सार<br>छोले<br>मटर पनीर / नवरत्न कुर्मा<br>पनीर बटर मसाला / तवा भाजी<br>काजु मटार / तोंडली<br>मेथी मशरुम / मटर मेथी मलई | पानास रु. १५/-<br>पानास रु. २५/-<br>पानास रु. २५/-<br>पानास रु. ३५/-<br>पानास रु. ३५/-<br>पानास रु. २५/- |
| | राईस / मसाला भात ऐवजी | व्हेज बिर्याणी<br>व्हेज पुलाव<br>पालक राईस<br>पीस पुलाव | पानास रु. २५/-<br>पानास रु. २०/-<br>पानास रु. २०/-<br>पानास रु. २०/- |
| | चायनीज | शेजवान राईस<br>व्हेज मंचुरियन<br>हक्का नुडल्स | पानास रु. ३५/-<br>पानास रु. ३५/-<br>पानास रु. ३५/- |
| जादा पदार्थ | दहीवडा, पालक पनीर रोल<br>आईस्क्रिम प्लेटला अंदाजे<br>स्वागत पेय - सोलकढी / सरबत / कॉफी<br>फरसाण - हरभरा कबाब, शेवपुरी, स्प्रिंग रोल | | पानास रु. २५/-<br>माणसी रु. ४० ते रु. ५०/-<br>माणसी रु. २०/-<br>माणसी रु. १५/- |

छोट्या समारंभासाठी पॅलेस दिले जाते. त्याचे बुकिंग १ महिना अगोदर करुन दिले जाते.
त्या संबंधी व्यवस्थापकाकडे चौकशी करावी.
लहान कार्यक्रमास तासाप्रमाणे पॅलेस मिळेल. (कमीत कमी ३ तास)